बुधवार, दि २ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### शेतकऱ्यांचा संयम संपला; गुरुवारपासून टोकाची पाऊले उचलणार!

# बा विठ्ठला, राज्यकर्त्यांना सुबुध्दी दे - राठी

**जालना । प्रतिनिधी -** देवमुर्ती (ता. जालना) येथे सुरु असलेल्या नांदेड-जालना समृध्दी बाधीत शेतकऱ्यांच्या आंदोलनाला मंगळवार (दि १) रोजी ६१ दिवस पूर्ण झाले. दोन महिने उलटुनही प्रशासनाने एकही ठोस पाऊल उचललेले नाही. केवळ ६७ जणांच्या चुका दुरुस्त करण्याव्यतिरीक्त प्रशासनाने काही एक केलेले नाही. सध्या पंढरपूरच्या दिशेने वारी निघालेली असून, पांडूरंगाने शासन-प्रशासनाला सुबुध्दी द्यावी, अशी प्रार्थना पांडुरंग चरणी करत गुरुवारपासून (ता. ३) टोकाची पाऊले उचलली जातील आणि होणाऱ्या परिणामांची जबाबदारी शासन-प्रशासनाची राहिल, असा इशारा आंदोलनाचे नेतृत्व पान ३ वर

## १२ लाखाला कशी जमिन घेता येते, हे मुख्यमंत्री आम्हाला पटवून देतील - कोल्हे महाराज

मुंबईत पावसाळी आधिवेशनाला सुरुवात झाली असून, १८ जुलैपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नांदेड-जालना समृध्दी महामार्गात जमिनीला काढलेला एकरी १२ लाखाचा भाव (पाच पटीत) कसा योग्य आहे, या १२ लाखात कुठे जमिन घेता येते, तसेच ५०० रुपयाला चंदनाचे झाड कसे घेता येते, ३५० रुपयाला द्राक्षाचे झाड कसे घेता येते, हे बाधीत शेतकऱ्यांना पटवून देतील, असे रामनगर येथील बाधीत शेतकरी हभप गणेश महाराज कोल्हे यांनी सांगितले.




## युवा आदर्श
### पूर नियंत्रण ...

महापूर नित्य येतो
मन रडे धाय धाय
कधी दुष्काळे पिडे
अंग लाही हायहाय
पूरा आमंत्रण नको
करे कायमचे उपाय
पूर्व नियंत्रण करावे
होऊ नये निरूपाय
पाऊस अस्ताव्यस्त
आपटत फिरे पाय
वाट फुटेलं तिकडे
उनाड पिसाटं जाय
निचरा वेळी करता
जल गुंतवे ठायठाय
नको विरोध धरणा
बांध बांधी अडवायं
वेळ लागे दीर्घकाळ
प्रकल्प ते घडवायं
विरोध फुके कशाले
योजना त्या सडवायं
जंगलतोड थांबवावी
पर्यावरण संवर्धनाय
मातीमोल नकोमाती
गती मृद संधारणाय

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी दूर करा

### प्राथमिक शिक्षक संघाची मागणी

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** महाराष्ट्र शासनाने श्री मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या ७ व्या वेतन आयोगातील वेतन त्रुटी निवारण समिती २०२४ ने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने २ जून २०२५ रोजी मार्गदर्शक तरतुदींचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद सेवेतील फक्त प्रशिक्षित प्राथमिक पदवीधर शिक्षक यांच्याच वेतन त्रुटीचे निवारण करण्यात आले आहे.

या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी तसेच जिल्हा परिषद स्तरावरून यासंबंधी पत्र निर्गमित करून पात्र प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांचे प्रस्ताव मागवण्यात यावे व त्यांची वेतन त्रुटी दूर करण्यात यावी असे निवेदन पान ३ वर



# मासिक पाळी महिलांसाठी वरदान - शीतल पवार

### जालना शहरातील सोनल नगर येथे महिला जागृती मेळावा



**जालना । प्रतिनिधी -** मासिक पाळी ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया असून ती महिलांसाठी वरदान आहे. मासिक पाळी नियमितपणे येणे हे स्त्रीचे शरीर निरोगी असल्याचे लक्षण आहे, असे प्रतिपादन स्त्री आरोग्याच्या प्रशिक्षक शीतल पवार यांनी येथे केले.

जालना येथील क्रांतिसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अक्कमहादेवी स्वयंसहायता महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि प्रोजेक्ट बाला अंतर्गत शहरातील सोनल नगर येथे मासिक पाळी संदर्भात महिला जागृती मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पान ३ वर

# वाढोणा खुनातील आरोपी दोन तासात अटक

### परतूर पोलीसांची कारवाई

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वाढोणा येथे दि. २९/०६/२०२५ रोजी सांयकाळी ६ ,वाजेच्या सुमारास वाढोणा शिवारात शेत गट क्रमांक ११९ मध्ये तक्रारदार गणेश तुळशीदास तनपुरे वय ६0 वर्ष व्यवसाय शेती रा. वाढोणा ता. परतुर जि. जालना व त्याचा मयत मुलगा किरण तनपुरे वय २४ वर्ष हे शेतात काम करीत असतांना त्याचे चुलत भाऊ परमेश्वर गुलाबराव तनपुरे, व त्याचा मुलगा किशोर परमेश्वर तनपुरे दोघे रा. वाढोणा यांनी शेतातील सामाईक बांधावरुन पावसाचे पाणी जाण्यासाठी तक्रादार याचे बाजुने चारी खोदली त्याबाबत तक्रारदार यांनी त्यांना विचारणा केली असता आरोपीने शिवीगाळ करुन तक्रारदार यांना चापटबुक्याने मारहाण करुन खाली पाडले. तेव्हा तक्रारदार यांचा मयत मुलगा किशोर तनपुरे यांने मध्यस्ती होवुन माझ्या वडीलांना कशाला मारहाण करता असे म्हणताच आरोपीने बांधावरील दगडाने किरण तनपुरे याच्या डोक्यावर, चेह-यावर जबर मारहाण करुन त्यास जागीच ठार मारुन गुन्हयाचे ठिकाणावरुन पसार झाले. या घटने बाबत पोलीस स्टेशन परतूर येथे दि.३0/0६/२०२५ रोजी सकाळी तक्रारदाराच्या तक्रारीवरुन खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन परतूर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून मृतदेह तपासणी करीता ग्रामीण रुग्णालय, परतूर येथे पाठवुन गुन्हयातील २, आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेऊन विचारपुस करीता त्यांनी गुन्हयाची पान ३ वर

युवा आदर्श   जालना   बुधवार, दि २ जुलै २०२५   E-mail- yuva.aadarsh@gmail.com   २

# संपादकीय

## वर्षा सहलीचा आनंद लुटा पण...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता. दोन वर्षापूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली. पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत. खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मर्यादेच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पुरी येथील अथवा अन्य धार्मिक स्थळी चेंगराचेंगरीचे गालबोट चिंताजनक!

ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या वेळेस रविवार दिनांक २९ जून २०२५ ला सकाळी पहाटे ४ वाजून ३० मिनिटांनी भावीक श्रीगुंडीचा मंदिराच्या सामोरं भगवान जगन्नाथ यांचे दर्शन करण्यासाठी भक्तगण मोठ्या संख्येने जमा झाले होते याच वेळेस अचानक धक्का-मुक्की झाली अशा परिस्थितीत लोकांना काहीच समजेनासे झाले व चेंगराचेंगरी झाली यात ६ भाविकांचा मृत्यू झाला तर ५० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झालेत.भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान लाखोच्या संख्येने भाविक येतात त्यामुळे अशा दुर्घटनांवर स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने करडी नजर ठेवने गरजेचे आहे.अशाच प्रकारे मे महिन्यात गोव्यातील लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा,महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात.परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला होता व ८० पेक्षा अधिक गंभीर जखमी झाले होते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला पुरीच्या रथयात्रे दरम्यान श्री गुंडीचा मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान श्री गुंडीचा मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच आ बैल मुझे मुझे मार अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला होता.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रम ादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला तर चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक,मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो.याकरीता सर्वांनीचजान है तो जहान है हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# विजय चित्ते यांचे शैक्षणिक कार्य प्रेरणादायी - बाळासाहेब खरात

**जालना । प्रतिनिधी -** विजय चित्ते यांचे आपल्या सेवा कालावधीतील शैक्षणिक कार्य अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी असून सरांनी यापुढेही आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य असेच सुरू ठेवावे असे प्रतिपादन माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना श्री बाळासाहेब खरात यांनी केले आहे.

वाघ्रूळ जहागीर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक श्री विजय संपतराव चित्ते यांनी वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यामुळे नियत वयोमानाप्रमाणे ते आज दिनांक ३० रोजी सेवानिवृत्त झाले आहे त्यामुळे त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता सोहळा वाघ्रूळ केंद्रातील सर्व शिक्षक वृंदांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दीपक खरात हे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री बाळासाहेब खरात शिक्षणाधिकारी माध्यमिक,मा.श्री.बबनराव खरात माजी जि.प.सदस्य,मा.श्रीमती सुषमाताई खरात माजी पं.स.सदस्य,श्री गजानन खरात,श्री विलासराव खरात सरपंच वाघ्रूळ,श्री सुधाकर खरात सरपंच कुंभेफळ,श्री अनिल निलख सरपंच निमगाव गुरु,श्री गोविंद खरात उपसरपंच,माननीय डॉ. भरत वानखेडे शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती जालना ,मा. श्रीमती गीता नाकाडे शिक्षण विस्तार अधिकारी,मा.श्री राम खराडे शिक्षण विस्तार अधिकारी जाफराबाद,मा.श्री अशोक इंगळे केंद्रप्रमुख वाघ्रूळ,मा. श्री विश्वनाथ तिडके केंद्रप्रमुख, मा. श्री सुनील ढाकरके, श्री भागवत जेठेवाड, श्री अशोक गायकवाड ,सावंगी तलाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री प्रमोद पवार, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्री मंगेश जैवळ,श्रीमती साधनाताई गिर्हे-जैवळ,प्राथमिक शिक्षक संघाचे श्री शांतिलाल गोरे, शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष श्री देवेंद्र बारगाजे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष श्री मधुकर काकडे,कास्ट्राईब संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री जगन्नाथ हनवते त्याचबरोबर श्री राजेश मुंगी पैठणकर, प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मुकुंद खरात यासह जालना जिल्ह्यातील विविध संघटनांचे पदाधिकारी, निमगाव गुरु तसेच वाघ्रूळ ज.येथिल ग्रामस्थ तसेच जिल्ह्यातील शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आपल्या भाषणांमधून विविध वक्त्यांनी श्री विजय चित्ते यांच्या संपूर्ण सेवा कालावधीतील दैदिप्यमान कामगिरीचा गौरव केला त्याचबरोबर श्री बाळासाहेब खरात,श्रीमती गीता नाकाडे, डॉक्टर भरत वानखेडे यांनीही श्री विजय चित्ते यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल गौरवोद्गार काढले.तसेच अनेक व्यक्तींनी त्यांच्या जीवन व सेवा कालावधीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रमोद नाईक यांनी, प्रास्ताविक श्रीमती मंजूषा खरात यांनी तर आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर घुमरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्री. सारंगधर डोके तसेच केंद्रीय प्राथमिक शाळा वाघरुळ येथील सर्व स्टाफ व केंद्रातील सर्व शिक्षक वृंदांनी परिश्रम घेतले.




## प्रा शाळा येवता येथे शाळा व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** १ जुलै रोजी प्राथमिक शाळा येवता येथे शाळा व्यवस्थापन समिती निवडीसाठी पालक सभा आयोजित करण्यात आली होती.या वेळी पालकांमधून शिक्षण अधिकार अधिनयम २००९ नुसार सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यामध्ये योगेश देविदास दळवी,विद्या छगन दळवी,शालिनी अमोल चौतमोल,सत्यभामा धनंजय कड, सईदा फिरोज शेख,हबीब सांडूखा पठाण,भगवान एकनाथ सपकाळ,दिगंबर रामराव राऊत,एकनाथ साहेबराव दळवी तर शिक्षणतज्ञ म्हणून सेवानिवृत्त केंद्र प्रमुख श्री भगवान अंबादास दळवी यांची निवड करण्यात आली.यामधून श्री योगेश देविदास दळवी यांची अध्यक्षपदी तर विद्या छगन दळवी यांची उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.याप्रसंगी श्री प्रदीप साळोक यांनी प्रास्ताविक केले तर श्री बबन जंजाळ यांनी प्रक्रिया विशद केली.आभार प्रदर्शन श्री रामेश्वर पवार यांनी केले.मुख्याध्यापक श्री विलास नवले,शिक्षक सर्वश्री संजय मोरे,श्रीकांत माळेकर, विष्णू इंगळे यांचेसह पालक माजी अध्यक्ष सावजी दळवी,दगडू सिरसाठ,शब्बीरखा पठाण मिस्त्री,दीपक दळवी आदी उपस्थित होते.




## पान १ वरुन

### बा विठ्ठला ...

करणारे दिलीप राठी यांनी यावेळी बोलतांना दिला.

ते पुढे म्हणाले की, प्रशासनाच्या वेळकाढू धोरणाला वैतागलेले शेतकरी आता आंदोलनाची दिशा बदलून गुरुवारपासून आंदोलन तीव्र करणार आहेत. गुरुवारी जलसमाधी घेणार असून, याची दखल घेऊन प्रशासनाने मार्ग न काढल्यास पुढील आठवड्यात छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर सर्व शेतकरी धडक देतील.

**गुरुवारी जलसमाधी घेणार - ॲड. मोरे**

देवमुर्ती येथे गेल्या २ महिन्यांपासून बाधीत शेतकरी आंदोलनाला बसलेले असून, अद्यापही प्रशासनाने त्यांचे आंदोलन सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. मागील ६१ दिवसांमध्ये ६७ शेतकऱ्यांच्या बाबतीत प्रशासनाच्या झालेल्या चुका दुरुस्त करण्याव्यतिरीक्त मुल्यांकनासंदर्भात चकार शब्दही काढलेला नाही. प्रशासनाचा वेळकाढूपणा आणि कासवापेक्षाही कमी असलेली गती याचा जर विचार केला तर वर्षभरही मार्ग निघण्याची शक्यता नाही. त्यामुळे आता शेतकरी पार वैतागले असून, गुरुवारी (ता. १) सर्व शतेकरी बाधीत जमिनीतील विहीरीत जलसमाधी घेतील, असा इशारा राम नगर (साखर कारखाना) येथील बाधीत शेतकरी ड. गोपाल मोरे यांनी यावेळी दिला.

### सातव्या वेतन ...

जालना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी संगीता भागवत मॅडम यांना देण्यात आले. यावेळी भागवत मॅडम यांनी सांगितले की यासंदर्भात फाईल माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येईल व लवकरच या संदर्भाने निर्णय होईल.

यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष श्री सुभाष भडांगे जालना बदनापूर शिक्षक पतसंस्थेचे सचिव श्री गणेश भुतेकर, सय्यद खान पठाण, सुधाकर इंगोले सर तसेच शिक्षक मित्र श्री प्रभाकर काळे सर उपस्थित होते.

### मासिक पाळी ...

मार्गदर्शक म्हणून शीतल पवार बोलत होत्या. यावेळी क्रांतिसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विष्णू पिवळ, अक्कमहादेवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा योगिता भोगावकर, योग, निसर्गोपचार चिकित्सक तथा पत्रकार विनोद काळे, सामाजिक कार्यकर्त्या रेणूका चव्हाण, आयएसडब्ल्यूएसचे जिल्हा समन्वयक नितीन जऱ्हाड, महिला व बालकल्याण विभागातील पुष्पा कापसे, मंगल उगले, नितेश चव्हाण, शुभम गोफने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शीतल पवार म्हणाल्या, मासिक पाळी ही महिलांच्या पुनरुत्पादक आरोग्यासाठी आवश्यक आहे. ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. मासिक पाळी अशुद्ध नाही. त्यामुळे या प्रक्रियेकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. महिलांनी याबाबत संकुचित मनोवृत्ती बाळगणे घातक ठरते आणि यातून पुढे गंभीर आजारांना सामोरे जावे लागते.

यावेळी उपस्थित महिला, किशोवयीन मुलींना प्रोजेक्ट बाला अंतर्गत कापडी सॅनिटरी पॅडस् वाटप करण्यात आले. तसेच यावेळी उपस्थित महिलांना बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णू पिवळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता भोगावकर यांनी केले. पुष्पा कापसे यांनी आभार मानले.

**योगामुळे निरामय आरोग्य - विनोद काळे**

योग, प्राणायाम, यौगिक व्यायाम हे प्रत्येक वयोगटातील व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त आहे. महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी आणि विशेषतः मासिक पाळीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या व्याधींना टाळण्यासाठी योग, प्राणायाम अतिशय उपयोगी आहे. महिलांना सकाळी सूर्योदयापूर्वी उठायची सवय असतेच; फक्त योगासाठी अर्धातास दिल्यास मासिक पाळीसह इतर समस्यांपासून सहज मुक्तता मिळू शकते, असा सल्ला योग, निसर्गोपचार चिकित्सक तथा पत्रकार विनोद काळे यांनी दिला.

### वाढोणा खुनातील ...

कबुली दिली असुन दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन त्यांना मा. न्यायालयासमोर पीसीआर कामी हजर केले जाणार आहे.

सदरची कामगिरी ही मा. अजयकुमार बन्सल, पोलीस अधिक्षक जालना, मा. आयुष नोपानी अपर पोलीस अधिक्षक जालना, पोलीस निरीक्षक मच्छींद्र सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक भिमराव मुंढे, सफौ नंदु खंदारे, पोअं /४११ राम हाडे, पोअं/१६०३ज्ञानेश्वर वाघ, पोअं/१४९० परमेश्वर माने, पोअं/३२२ दिपक आहे, पोअं/७३१ नरेंद्र चव्हाण, पोअं/ ५८९ अच्युत चव्हाण, महीला पोलीस अंमलदार कल्पना धडे आदीनी केली आहे.

मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानास्पद क्षण!

# ‘अबीर’ने जर्मन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात वाजवला डंका!

सुदेश भैय्या झावरे पाटील निर्मित आणि आकाश शिंदे दिग्दर्शित ‘अबीर’ या मराठी चित्रपटाने *जर्मनीतील २२व्या इंडियन फिल्म फेस्टिवलमध्ये* आपली छाप पाडली आहे. जगभरातील १९४ देशांमधून आलेल्या हजारो चित्रपटांमधून केवळ तीन भारतीय चित्रपटांची निवड झाली असून, त्यातील ‘अबीर’ हा एकमेव मराठी चित्रपट आहे. ऑस्कर आणि कान्सनंतर जर्मनीतील हा चित्रपट महोत्सव जगभरात मानाचा समजला जातो.

विशेष म्हणजे यात चित्रपटात,प्रशांत नेटके पाटील यांची भूमिका मुलीचा मामा असुन मामीची भूमिका निकू फुले यांची कन्या गार्गी फुले यानी केली आहे. तसेच देवकी दफ्तरदार,पायल जाधव,गार्गी फुले,प्रशांत नेटके पाटील,यश डिम्बले,गणेश देशमुख,निखील चव्हाण,यांच्या प्रमुख भुमीका असुन,अहिल्यानगर येथील बर्याच कलाकारांचा सहभाग आहे.तसेच जिल्ह्याचे व पारनेरचे नेते सुजित झावरे पाटील यांनी या चित्रपटात पाहुणा कलाकार दमदार भूमिका केलेली आहे..

**अहिल्यानगरचा अभिनेता प्रशांत नेटके पाटील यांची भूमिका असलेला चित्रपट, थेट जर्मनीतील आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमधे**






## झाडे लावा झाडे जगवा

# जन्म मृत्यू प्रमाणपत्र संदर्भातील न्यायालयीन प्रक्रिया पुन्हा सुरु करावी - ॲड धन्नावत

### विधानसभेच्या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करण्याची अपेक्षा



**जालना । प्रतिनिधी -** पूर्वी जिल्हा व तालुका न्यायालयांतून जन्ममृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यासाठीची प्रक्रिया राबविली जात होती. परंतु, सध्या ही जबाबदारी तहसील कार्यालयांकडे वर्ग करण्यात आली आहे. परिणामी अनेक नागरिकांना प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विलंब व अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच न्यायालयीन प्रक्रिया सुरू करावी आणि हा मुद्दा विधानसभेच्या चालू अधिवेशनात उपस्थित केला जावा, अशी मागणी नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड महेश धन्नावत यांनी केली आहे.

यासंदर्भात ॲड धन्नावत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी या प्रक्रियेमुळे नागरिकांना स्थानिक पातळीवरच न्याय मिळत होता. मात्र, सध्या महसूल कार्यालयात अनेक अनियमितता आणि विलंब होत असून, गरजू नागरिकांना वेळेत जन्म- मृत्यू प्रमाणपत्र मिळत नाही. माजी महसूलमंत्री श्री. किशोर सोमय्या यांनी महसूल विभागाकडे सदर प्रक्रिया वर्ग करण्याचा निर्णय घेतला असला, तरी प्रत्यक्षात नागरिकांच्या अडचणी वाढल्यात. शासनाच्या आदेशानुसार तहसील कार्यालयात दस्ताऐवज सादर करून प्रक्रियेला सुरुवात होते. मात्र, यात अपुरे दस्त, कर्मचाऱ्यांची कमतरता, भ्रष्टाचार आणि वेळेचा अपव्यय यामुळे अनेक जणांवर अन्याय होतो आहे. अनेकांना महत्वाचे कार्यासाठी जसे मिळकत स्वतःच्या नावाने करण्यासाठी, शासन योजना व इतर शासकीय कार्यालयात जन्म-मृत्यु प्रमाणपत्र देण्यासाठी अनेक अडचणी येत असल्याने आम्हा विधिज्ञांनासुध्दा याचा त्रास सहन लागत आहे. त्यामुळे वेळेत जन्म-मृत्यु नोंद करुन प्रमाणपत्र देण्यासंदर्भात पुन्हा न्यायालयाकडे प्रकरण वर्ग करण्यासाठी शासन परिपत्रक किंवा कायदा करणे न्याय व गरजेचे आहे. न्यायालयीन प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि वेळबद्ध निर्णय मिळतो. त्यामुळे जन्म मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्याची कार्यवाही पुन्हा न्यायालयामार्फतच सुरू करण्यात यावी किंवा अशा तक्रारींची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी ड. धन्नावत यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती राज्य व जिल्हा वकील परिषदेच्या अध्यक्षांनाही सादर करण्यात आल्या आहेत.

